This is a digital copy of a book that was preserved for generations on library shelves before it was carefully scanned by Google as part of a project to make the world's books discoverable online.

It has survived long enough for the copyright to expire and the book to enter the public domain. A public domain book is one that was never subject to copyright or whose legal copyright term has expired. Whether a book is in the public domain may vary country to country. Public domain books are our gateways to the past, representing a wealth of history, culture and knowledge that's often difficult to discover.

Marks, notations and other marginalia present in the original volume will appear in this file - a reminder of this book's long journey from the publisher to a library and finally to you.

Usage guidelines

Google is proud to partner with libraries to digitize public domain materials and make them widely accessible. Public domain books belong to the public and we are merely their custodians. Nevertheless, this work is expensive, so in order to keep providing this resource, we have taken steps to prevent abuse by commercial parties, including placing technical restrictions on automated querying.

We also ask that you:

+ *Make non-commercial use of the files* We designed Google Book Search for use by individuals, and we request that you use these files for personal, non-commercial purposes.

+ *Refrain from automated querying* Do not send automated queries of any sort to Google's system: If you are conducting research on machine translation, optical character recognition or other areas where access to a large amount of text is helpful, please contact us. We encourage the use of public domain materials for these purposes and may be able to help.

+ *Maintain attribution* The Google "watermark" you see on each file is essential for informing people about this project and helping them find additional materials through Google Book Search. Please do not remove it.

+ *Keep it legal* Whatever your use, remember that you are responsible for ensuring that what you are doing is legal. Do not assume that just because we believe a book is in the public domain for users in the United States, that the work is also in the public domain for users in other countries. Whether a book is still in copyright varies from country to country, and we can't offer guidance on whether any specific use of any specific book is allowed. Please do not assume that a book's appearance in Google Book Search means it can be used in any manner anywhere in the world. Copyright infringement liability can be quite severe.

About Google Book Search

Google's mission is to organize the world's information and to make it universally accessible and useful. Google Book Search helps readers discover the world's books while helping authors and publishers reach new audiences. You can search through the full text of this book on the web at http://books.google.com/

'ar. Gen. 20/1.

14 A 9

14 A 19/2

Published for the Educational Department.

MARÁTHÍ FIRST BOOK

FOR THE USE OF

GOVERNMENT SCHOOLS

BY

RÁO SÁHEB BHÁSKAR DÁMODAR.

RECAST AND REVISED

BY

THE MARÁTHÍ TRANSLATOR, E. D.

Second Stereotyped Edition.

Registered according to Government of India Act XXV. of 1867.

Bombay:
GOVERNMENT CENTRAL BOOK DEPOT.

1870.

Price (1-6) *One Anna Six Pies.*

Published for the Educational Department.

MARÁṬHÍ FIRST BOOK

FOR THE USE OF

GOVERNMENT SCHOOLS

BY

RÁO SÁHEB BHÁSKAR DÁMODAR.

RECAST AND REVISED

BY

THE MARÁṬHÍ TRANSLATOR, E. D.

Second Stereotyped Edition.

Registered according to Government of India Act XXV. of 1867.

Bombay:
GOVERNMENT CENTRAL BOOK DEPOT.

1870.

Price (1-6) *One Anna Six Pies.*

14.A.9.

Indian Institute, Oxford.

Presented
by the
Rev. W. B. Keer
April 1885.

सरकारी शाळांतील मुलांकरितां
पहिलें पुस्तक.

रा॰ सा॰ भास्कर दामोदर पाळंदे
ह्यांनीं केलें होतें तें,

कायम ठशांनीं छापावयाकरितां

मेहरबान देरेक्तर आफ् पब्लिक् इन्स्त्रक्शन्
ह्यांच्या हुकमावरून

मराठी त्रान्स्लेतर
ह्यानें शोधून तयार केलें.

हिंदुस्थान सरकारच्या सन १८६७ च्या २५व्या आक्टा-
प्रमाणें मालकी नोंदली आहे.

आवृत्ति दुसरी.

मुंबई.
गवर्नमेंत सेंत्रल बुक दिपो.

इसवी सन १८७०. शके १७९२.

किंमत (१॥) दीड आणा.

मुंबईमध्यें एज्युकेशन सोसैटीच्या छापखान्यांत छापिलें.

लहान मुलांकरितां पहिलें पुस्तक.

मूळाक्षरें.

स्वर.

अ आ इ ई उ ऊ

ऋ ॠ ऌ ॡ ए ऐ

ओ औ अं अः

व्यंजनें.

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न

प फ ब भ म

य र ल व

श ष स ह

ळ क्ष ज्ञ.

अंक.

० १ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९

सूचना. शिक्षकानें प्रथम क्रमानें वर्ण शिकवावे. त्यांची पक्की माहिती मुलांस झाली म्हणजे क्रम सोडून मधले मधले वर्ण त्यांस शिकवावे.

वाचावयाचे शब्द.

कर	घर	मठ	रथ
ईट	ईद	ऊर	ऊठ
गप	खप	पर	रग
एक	ऐक	चल	कस
नख	जग	मग	तप
वड	पड	पळ	वळ

कट	कड	कढ	चढ
पट	तट	नट	नथ
धर	सर	मर	वर

मन	वन	धन	तन
कण	सण	मण	रण
रड	घड	बग	बक

बट	भट	बस	रस
ढग	गड	जड	घण
नळ	बळ	तळ	फळ
ढब	चव	भय	जय
आग	ओघ	ओत	औत
आज	आड	आळ	ओस

कपट	तरट	गवत
गमत	तबक	बदक
मसक	ठणक	नगर
नजर	शहर	शरम
दगड	फणस	जखम
रकम	कळप	कलम
ओळख	औषध	धनगर
गडबड	बळकट	लवकर

बाराखड्या.

स्वर	अ	आ	इ	ई	उ	ऊ	ए	ऐ	ओ	औ	अं	अः
खुणा		ा	ि	ी	ु	ू	े	ै	ो	ौ	ं	ः
	क	का	कि	की	कु	कू	के	कै	को	कौ	कं	कः
	ख	खा	खि	खी	खु	खू	खे	खै	खो	खौ	खं	खः

ग गा गि गी गु गू गे गै गो गौ गं गः

घ घा घि घी घु घू घे घै घो घौ घं घः

---

१ टीप. अनुस्वार आणि विसर्ग हे अ ह्या स्वरास लावून बाराखडींत दाखविले आहेत, पण ते अवघ्या स्वरांस लागतात; जसें, आं इं ईं कुं कूं किः कुः इत्यादि.

---

२ टीप. सर्व व्यंजनांच्या बाराखड्या एथें लिहिण्याचें कारण नाहीं. ज्या लिहिल्या आहेत त्या शिकवून त्याधोरणानें इतर व्यंजनांच्या बाराखड्या शिक्षकानें मुलांकडून लिहवाव्या व वाचवाव्या.

वाचावयाचे शब्द.

कुशा	काशी	गाय	पाटी
विठू	गोदा	शेळी	टोपी
मोरू	भिमी	पोथी	दौत
घोडा	घोडी	पेरू	बैल
गूळ	गोटा	गोटी	रेडा
चाक	चार	दादा	मामा
गाळ	घाम	ताप	गाडी
हात	पाय	बोट	नाक

अरे	अगे	अहो	आणि
आजा	आजी	मामा	मामी

असा	कसा	जसा	तसा
चोर	पोर	थोर	मोर
वाडा	किडा	विडा	पिडा
डोळा	काळा	निळा	पिळा
पोट	पाठ	गाल	गळा
ऊर	जीभ	मान	डोकें

पाणी	पोळी	भात	लाडू
तूप	दूध	लोणी	ताक
कढी	भाजी	पाला	मेवा
झाड	फूल	साल	मूळ

पान ढाळी शिडी दोरी
मौज फौज खेळ वेळ
पेटी वाटी रेती वाळू
भाऊ अळू दार मीठ

चिमटा हिरवा पिंवळा पिकला
बहीण चुलता चुलती मावशी
मेहुणा बोकड गाढव कावळा
पारवा गिधाड चिमणी वाईट
गरीब सालस लबाड शेजार
तुकडा मुलगा मुलगी विहीर

ओसरी पडवी खिडकी कवाड

भाकर साखर उखळ मुसळ

मोतीं गोंदू जांब तोंड

दांत ओंठ दहीं देंठ

पांटी फांदी आंबा खांब

लांब सोंग ढोंग कोंब

तांबडा पांढरा सांवळा कोंवळा

आंबट मांजर चांगला भोंपळा

जोंधळा गोंधळ पांगळा कोंबट

जांभळा पांखरूं वांसरूं कोंकरूं

ऋकारयुक्त अक्षरें.

(कऋ) कृ (गऋ) गृ (नऋ) नृ

(दऋ) दृ (तऋ) तृ (बऋ) बृ

(पऋ) पृ (मऋ) मृ (वऋ) वृ

(सऋ) सृ (हऋ) हृ

वाचावयाचे शब्द.

कृपा गृह तृषा

दृष्टि नृप पृष्ठ

वृष्टि बृहत् मृत

सृष्टि हृदय

सूचना. हे शब्द कठीण आहेत. ह्यांचा अर्थ मुलांस पुढें सांगावा. हीं अक्षरें मुलांस ओळखतां यावीं इतकाच हें लिहिण्याचा उद्देश आहे.

अनुस्वारयुक्त शब्द.

अंग अंबा चिंच सुंदर

उंट सुंठ पिंगळा इंगळ

विसर्गयुक्त शब्द.

प्रातःकाळ

इतःपर

कःपदार्थ

जोडाक्षरें.

शिक्षकास सूचना.

जोडाक्षरें शिकवितांना दोन अगर तीन अक्षरें कशीं जोडलीं जातात हें शिक्षकानें मुलांस दाखवावें.

कोठें कोठें एकाखालीं एक लिहितात; कोठें कोठें एकापुढें एक लिहितात; कोठें कोठें पहिल्या अक्षराचा काना सोडतात, किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा लोप करितात.

खालीं किंवा पुढें जें अक्षर लिहिलें असतें त्याचा उच्चार मागून होतो.

जीं जोडाक्षरें लिहिलीं आहेत त्याहून आणखी पुष्कळ आहेत. तीं ह्यांवरून समजतील.

(कक) क्क (कत) क्त (कय) क्य (कर) क्र, क्र

(कव) क्व (खय) ख्य (गन) ग्न (गय) ग्य

(गर) ग्र (गल) ग्ल (घन) घ्न (चच) च्च

(चछ) च्छ (जज) ज्ज (जय) ज्य (जव) ज्व

(टट) ट्ट (डय) ड्य (णण) ण्ण (णय) ण्य

(तत) त्त (तन) त्न (तप) त्प (तम) त्म

(तमय) त्म्य (तय) त्य (तर) त्र (तव) त्व

(दध) द्ध (दभ) द्भ (दम) द्म (दय) द्य

(दर) द्र (दव) द्व (नन) न्न (नय) न्य

(नह) न्ह (पत) प्त (पन) प्न (पय) प्य

(पर) प्र (बद) ब्द (बर) ब्र (भर) भ्र

(भय) भ्य (मय) म्य (मर) म्र (मल) म्ल

(रक) र्क (रग) र्ग (रप) र्प (रय) र्‍य, र्य

(लप) ल्प (लह) ल्ह (वय) व्य (वर) व्र

(शन) श्न (वह) व्ह (शय) श्य (शर) श्र

(शल) श्ल (शव) श्व (शच) श्च (षक) ष्क

(षट) ष्ट (षण) ष्ण (षप) ष्प (षम) ष्म

(सक) स्क (सत) स्त (सथ) स्थ (सन) स्न

(सप) स्प (सम) स्म (सर) स्र (सतर) स्त्र

(सव) स्व (हम) ह्म (हय) ह्य (हर) ह्र

(क्षण) क्ष्ण (क्षम) क्ष्म (क्षय) क्ष्य

वाचावयाचे शब्द.

अक्कल शक्त वाक्य चक्र

चक्र पक्व सख्य नम्र

योग्य उग्र ग्लानि विघ्न

उच्च स्वच्छ मज्जा राज्य

ज्वर	हट्ट	जाड्य	अण्णा
अरण्य	पित्त	रत्न	तत्पर
आत्मा	सात्म्य	सत्य	चित्र
सत्व	शुद्ध	उद्भव	पद्म
विद्या	निद्रा	द्वेष	अन्न
अन्य	पुन्हा	तप्त	स्वप्न
प्याला	प्रथम	शब्द	ब्राह्मण
शुभ्र	सभ्य	ग्राम्य	नम्र
म्लान	तर्क	स्वर्ग	सर्प
आर्य	सुऱ्या	अल्प	जिल्हा

व्यय तीव्र प्रश्न तेव्हां

अवश्य आश्रय श्लोक अश्व

निश्चय पुष्कळ नष्ट उष्ण

पुष्प उष्मा तस्कर सुस्त

स्वस्थ स्नान स्पष्ट भस्म

स्नाव शास्त्र स्वस्थ ब्राह्मण

ह्यानें ऱ्हस्व तीक्ष्ण लक्ष्मी

लक्ष्य

सूचना. वरच्या धड्याचा मुख्य उद्देश मुलांस जोडाक्षरें ओळखतां यावीं हाच आहे. ह्यांत कठीण शब्द आहेत त्यांचा अर्थ मुलांस पुढें सांगावा.

धडा पहिला.

हा बाप.	हा आंबा.
ही आई.	ही मनी.
हें मूल.	हें केळें.
तो मुलगा.	तो कुत्रा.
ती मुलगी.	ती लेखणी.
तें पोर.	तें पांखरूं.

धडा दुसरा.

मला आंबा दे.	तो कुत्रा द्वाड आहे.
तुला केळें देतों.	तो उगाच भोंकतो.
त्याला पेरू देईन.	ती मुलगी हट्टी आहे.
गोविंदा आज आला.	तुझें तोंड स्वच्छ नाहीं.
रामचंद्र काल गेला.	माझे हात भिजले आहेत.
मनी काल भेटली.	हें घर लहान आहे.
तो परकर मला दे.	तो वाडा मोठा आहे.
हा अंगरखा तूं घे.	हें चित्र चांगलें आहे.

धडा तिसरा.

तो कुत्रा द्वाड नाहीं.
ती मुलगी हट्टी नाहीं.
तें चित्र चांगलें नाहीं.
हा आंबा गोड आहे.
ती लेखणी मोडली आहे.
हें झाड उंच आहे.
तें पोर रडकें आहे.
काल चांगला पाऊस पडला.
हे मुलगे लहान आहेत.
पाऊस पडून पीक होईल.

धडा चौथा.

भिमी हट्टी आहे. कुशी हट्टी नाहीं.
लेखण्या दोनच आहेत. कागद थोडे आहेत.
गोविंदाचा हात लांब आहे.
झाडाची खांदी फार बारीक आहे.

घराची भिंत फार उंच नाहीं.
गाडीचें चाक वाटोळें असतें.
भांड्याचें तोंड रुंद आहे.
घराचीं दारें ठेंगणीं आहेत.
आंब्याचा रस गोड लागतो.
आंबा पिकला असला तर खा.
तो मुलगा भुकेला दिसतो पहा.
उंसाचीं कांडीं पुष्कळ आहेत.

धडा पांचवा.

माझी आई सकाळीं फुलें आणिते.
हा तुमचा बाग आहे ना?
ह्यांत फुलें पुष्कळ दिसतात.
आमच्या शेतांत बाजरी पिकते.
नानाचे तीन अंगरखे धुवायास दे.
मामानें मला मातीचें चित्र दिलें.
वारा आला पाऊस गेला.

म्हैस पुष्कळ दूध देते.

दिवस वर आला पहा.

चांद उगवला आहे.

त्या विहिरीचें पाणी खारें नाहीं.

ह्या तळ्याचें पाणी गोडें आहे.

धडा सहावा.

अंतू, इकडे ये; तो पाट आणून ठेव, त्याजवर बैस.

दादा, माझी लोटी कोठें आहे? मी कशानें पाणी पिऊं?

आई, वाटींत मला कांहीं खाऊं दे; मला भूक लागली आहे.

काका, त्या टोपलींतून मला एक अंजीर दे.

मला एक लहानशी टोपली पाहिजे; देशीलना?

बुरुडाला सांगून मी तुला एक टोपली आणवीन.

चौरंगाचा खूर मोडला, तो कोण नीट करील बरें?

हें काम सुताराशिवाय चांगलें होणार नाहीं.

पांडू सुतार चुका मारून चौरंगाचा खूर बसवील.

काका, मला एक चूक देशील बरें?

अरे, चूक घेऊन तूं काय करशील?

मला ती खेळायास पाहिजे, म्हणून मागतों.

चूक, चाकू, सुरी, हीं मुलाचीं खेळणीं नव्हत.

धडा सातवा.

मुलगा आणि बोरें.

एका भांड्यांत पुष्कळ बोरें होतीं, तीं एका मुलानें पाहिलीं. तो म्हणाला, मी हीं बोरें काढून खाईन. त्यानें भांड्यांत हात घातला, आणि हातांत पुष्कळ बोरें घेतलीं, परंतु भांड्याचें तोंड लहान होतें, त्या मुळें त्याचा हात बाहेर निघेना. त्याचा बाप जवळ होता, तो त्यास म्हणाला, इतकीं बोरें एकदम कशीं निघतील? थोडीं घे, म्हणजे तुझा हात बाहेर निघल.

मुलानें पांच बोरें काढिलीं, आणि तो म्हणाला, मला इतकींच पुरत.

जो मुलगा कोणताही पदार्थ एकदम पुष्कळ घ्यावयास पाहतो त्यास तो मुळींच मिळत नाहीं. तोच थोडा घेऊं लागला तर सहज मिळतो.

धडा आठवा.

मुलगे आणि बेडूक. (कल्पित गोष्ट).

कांहीं मुलगे तळ्याच्या कांठीं गेले, आणि मौजेनें तळ्यांत दगड फेंकूं लागले. त्या तळ्यांत बेडूक होते, त्यांना हे दगड लागले, ह्या मुळें त्यांस फार दुःख झालें. ते म्हणाले, आतां काय करावें? तेव्हां त्यांतील एक बेडूक मुलांस म्हणाला, मुलांनो, आम्हांला दगड कां मारितां? मुलगे म्हणाले, आम्ही दगडांनीं खेळत आहों. बेडूक म्हणाला, तुमचा खेळ होतो, पण आमचा जीव जातो. तेव्हां एक शहाणा मुलगा म्हणाला, गड्यांनो, हा खरें बोलतो, आपण ह्यांस दुःख देऊं नये.

आपण कोणतेंही काम करूं लागलों, किंवा खेळ खेळूं लागलों, तर त्या पासून दुसऱ्या

कोणास उपद्रव होईल कीं काय ह्याचा पूर्वी विचार करावा.

धडा नववा.

नाना.

नाना आणि मनी हीं भावंडें होतीं. नाना मनीपेक्षां मोठा होता, पण आळशी होता. शाळेंत वेळच्या वेळेस जात नसे. एके दिवशीं तो शाळेंत न जातां खेळायास गेला. दुसरे दिवशीं त्याला पंतोजीनें विचारिलें, तूं काल कोठें गेला होतास? तो म्हणाला, मला ताप आला होता. पंतोजीनें संध्याकाळीं त्याच्या घरीं जाऊन बापास पुसलें, नानाला काल ताप आला होता कीं काय? बाप म्हणाला, नाहीं. तेव्हां पंतोजी म्हणाला. नाना लबाड आहे. जो मुलगा लबाड तो मला आवडत नाहीं. हें ऐकून नानाला फार वाईट वाटलें. तो म्हणाला, मी आजपासून कधीं खोटें बोलणार नाहीं.

आळशी व उनाड मुलें शाळेंत जात नाहींत किंवा शाळेचें निमित्त करून खेळायास जातात,

आणि मग पंतोजी किंवा आईबाप रागें भरतील म्हणून खोटें बोलतात, अशीं मुलें कोणासही आवडत नाहींत.

धडा दहावा.

वेडा मुलगा.

जो मुलगा आपली पोथी जपून ठेवीत नाहीं, मळवितो, त्याला वेडा म्हणावें. शहाणा मुलगा आपली पोथी फाडीत नाहीं, आणि पोथीवर शाई पाडीत नाहीं. वाईट मुलगा टवाळकी करितो. चांगला मुलगा दुसऱ्या पोरांशीं भांडत नाहीं, व त्यांच्या खोड्या करीत नाहीं. वेडा मुलगा आईबापांचें सांगितलें ऐकत नाहीं. वाईट मुलगा कोणास आवडत नाहीं. चांगला मुलगा सर्वांस आवडतो. वाईट मुलावर कोणी प्रीति करीत नाहीं. चांगल्या मुलावर सर्व लोक प्रीति करितात, म्हणून मुलानें आणि मुलीनें चांगलें व्हावें.

धडा अकरावा.

चांगला मुलगा.

चांगला मुलगा लवकर उठून शाळेस जातो. वाईट मुलगा शाळेस जातांना रडतो. चांगला मुलगा आई बाप सांगतील तसें ऐकितो. वाईट मुलगा हट्ट करून मार खातो. चांगला मुलगा पंतोजीच्या आज्ञेंत राहतो. वाईट मुलगा आपला धडा पाठ करीत नाहीं. चांगला मुलगा खोटें बोलत नाहीं, खरें बोलतो. वाईट मुलगा शेजाऱ्याच्या मुलास मारितो, शिव्या देतो. शहाणा मुलगा खाऊसाठीं हट्ट करीत नाहीं. वाईट मुलगा दुसऱ्याची वस्त चोरून नेतो. शहाणा मुलगा आपलें काम वेळच्या वेळेस करितो.

धडा बारावा.

मनी.

मनी नानापेक्षां धाकटी होती, पण शहाणी होती. ती नित्य शाळेंत जाई. ती आपला धडा चांगला शिके; म्हणून पंतोजी तिला शाबासकी

देई. ती घरांत दांडगाई करीत नसे. आईनें कांहीं काम सांगितलें तर ती तें लागलेंच करी. एके दिवशीं तिच्या भावानें तिला म्हटलें, ही यमनोची बाहुली पडली आहे, ती आपण खेळायास घेऊं. ती म्हणाली, दुसऱ्याची वस्त आपण कशी घ्यावी? आपणाला चोर म्हणतील. हें बोलणें बापानें ऐकिलें, तेव्हां तो म्हणाला, मन्ये, शाबास! ही घे तुला दुसरी बाहुली. मी नान्याला कांहीं देणार नाहीं, तो द्वाड आहे.

आपण दुसऱ्याची वस्त त्यानें दिल्या खेरीज अथवा त्याला विचारल्या खेरीज कधींही घेऊं नये. आपली एखादी वस्त आपणास न कळवितां दुसऱ्या कोणीं घेतली तर आपणास जसें वाईट वाटतें, तसेंच आपण दुसऱ्याची घेतली म्हणजे त्यास वाटतें.

धडा तेरावा.

कुलुंगें कुत्रें.

कुत्र्यांमध्यें एक लहान जात आहे, त्या जातीच्या कुत्र्यास कुलुंगें कुत्रें म्हणतात. हें कुत्रें मांजरापेक्षां कांहींसें मोठें असतें. ह्या

कुत्र्याचा रंग कांहींचा पांढरा असतो, कांहींचा काळा असतो, आणि कांहींचा बांडा असतो. कुलुंगें कुत्रें स्वभावानें गरीब असतें, आणि दिसण्यांत सुरेख दिसतें. हें घरच्या माणसा सारखें घरांत फिरत असतें. हौशी लोक कुलुंगें कुत्रें मौजेनें बाळगितात. हें कुत्रें धन्याबरोबर खेळून धन्याला संतोष देतें. धन्याच्या मुलां-बरोबर खेळतें. धन्याबरोबर बाहेर फिरावयास जातें. लाडक्या पोराप्रमाणें धनी त्याचे लाड करितो. आणि तेंही तसेंच धन्याबरोबर वागतें. कुलुंगें कुत्रें जे बाळगितात त्यांस त्या कुत्र्याशीं खेळणें व त्याचे लाड करणें ही एक मोठी गमत असते.

धडा चौदावा.

मांजराचें शहाणपण.

मांजर हें फार उपयोगी जनावर आहे. हें उंदरांस मारितें. आपल्या घरांत उंदीर पुष्कळ झाले तर ते दाणे व चिरगुटें खाऊन उपद्रव करितात. पण घरांत मांजरें असलीं म्हणजे उंदरांचा बंदोबस्त होतो.

मांजराच्या शहाणपणा विषयीं एक मौजेची गोष्ट आहे. एका गृहस्थाच्या घरीं अशी चाल होती कीं जेवणाची वेळ झाली म्हणजे घांट वाजवावी. घांट वाजतांच जेवणार मंडळी जमत असे, आणि त्यां बरोबरच मांजरही येई, आणि त्यास खावयास मिळे.

एके दिवशीं जेवणाच्या वेळीं मांजर घरांत नव्हतें. तें आल्यावर पुष्कळ वेळ पर्यंत घांट वाजली नाहीं, आणि त्यास खावयास मिळालें नाहीं; म्हणून तें ज्या खोलींत घांट टांगून ठेविली होती त्या खोलींत गेलें, आणि घांटेच्या दोरीस ओळकंबून त्यानें घांट वाजविली. तेव्हां भलत्याच वेळीं घांट वाजली म्हणून घरांतील माणसें पहायास गेलीं; तों मांजर घांट वाजवीत आहे, असें त्यांच्या दृष्टीस पडलें.

धडा पंधरावा.

रंगाविषयीं.

कोळशांचा रंग काळा, काजळाचा रंग काळा, कावळ्याचा रंग काळा.

चुन्याचा रंग पांढरा, खडूचा रंग पांढरा, कापसाचा रंग पांढरा, दुधाचा रंग पांढरा, रुप्याचा रंग पांढरा.

हळदीचा रंग पिंवळा, हरभऱ्याच्या दाळीचा रंग पिंवळा, सोन्याचा रंग पिंवळा.

कुंकवाचा रंग तांबडा, रक्ताचा रंग तांबडा, शेंदराचा रंग तांबडा, अळित्याचा रंग तांबडा, कुसुंब्याचा रंग तांबडा, तांब्याचा रंग तांबडा.

झाडांच्या पानांचा रंग हिरवा, ओल्या गवताचा रंग हिरवा, पोपटाचा रंग हिरवा, पाचेचा रंग हिरवा.

गुळीचा रंग निळा, आकाशाचा रंग निळा. हे रंग मुलांस ओळखतां यावे.

धडा सोळावा

आई, मला झोंप येते. माझें आंथरूण कोठें आहे? मुला, तुझें आंथरूण माजघरच्या खोलींत घालून ठेविलें आहे. जा, आणि त्याजवर नीज. आई, त्यावर पांघरूण नाहीं. माझी पासोडी काय झाली? तुझी पासोडी तुझ्या आंथरुणावर मीं ठेविली होती. तुझ्या बहिणीनें घेतली असेल, पहा. आई, माझी पासोडी यमनी पांघरून निजली आहे. तिच्या आंगावरची काढून घेऊं काय? तिच्या आंगावरची काढूं नको. तर मग मीं काय पांघरूं? माझ्या आंथरुणावर सकलाद आहे ती तूं पांघरावयास घे. आई, ती सक़लाद जड आहे ती मला नको. ती नको तर रजई आहे ती घे. पण रजईच्या आंतून काय लावूं? मुला, तुझें अंगवस्त्र आहेना, तें लाव, म्हणजे झालें. उगीच कटकट करूं नको. जा तिकडे नीज जाऊन.

धडा सतरावा.

मुला, तूं कोठें जातोस? मी शाळेस जातों. तूं कोणत्या शाळेंत जात असतोस? मी सरकारी शाळेंत जात असतों. तूं शाळेंत काय शिकत असतोस? मी धुळाक्षर आणि बाराखड्या शिकत असतों. तुला शाळेस जाऊं लागून किती दिवस झाले? झाले मला सहा महिने. अजून तुला धुळाक्षर आलें नाहीं काय? अकरकीं आणि येकोत्रीं मात्र राहिलीं आहेत; वरकड सारें झालें. बाराखड्या संपावयास आणखी किती दिवस लागतील? पुढल्या आठवड्यांत संपतील. तुझ्या वर्गांत किती मुलें आहेत? माझ्या वर्गांत अठरा मुलें आहेत. त्यांत तुझें नांव कितवें आहे? माझें नांव पांचवें आहे. तर तूं बराच खालीं आहेस. मी खालीं कशाचा? माझ्या पेक्षां पुष्कळ मुलें खालीं आहेत. मुला, तूं झटून शीक म्हणजे वर जाशील.

धडा अठरावा.

गोविंदा, ऊठ लवकर; शाळेस जावयाची वेळ झाली. तुझे सोबती तुला बाहेर हाका मारीत आहेत. दिवस पहा, वर किती आला तो. तुझे सोबती पुढें गेले. तूं उशीर करून गेलास तर तुझा पंतोजी तुला रागें भरणार नाहीं काय? मला वाटतें तो तुला मारील देखील. तूं उशीरां गेल्यावर आपला धडा कसा पाठ करशील? तुझे सोबती पुढें जातील, आणि तूं मागें राहशील, ह्या गोष्टीची तुला लाज वाटावी. चांगलीं मुलें शाळेस जाण्याची वेळ कधीं चुकवीत नाहींत. शाळेंत गेल्यावर खेळण्याकडे आपलें चित्त गुंतवीत नाहींत. पंतोजीनें दिलेला धडा मन लावून पाठ करितात. आणि पंतोजीपासून शाबासकी मिळवितात. तुझ्या सारख्या आळशी मुलाला शाळेंतलीं दुसरीं मुलें हांसतात. आळशी मुलगा पंतोजीला आणि आईबापांला आवडत नाहीं. ऊठ लवकर, शाळेस जा.

धडा एकोणिसावा.

मुला, इकडे ये, माझ्याजवळ बैस. तिकडे जाऊं नको. मीं सांगितलें आहे तें काम कर. तो तिकडे कोण आला आहे? तुला कोण हाका मारितो? त्याला सांग कीं मी एव्हां येत नाहीं. गंगीला म्हणावें, गाईला पाणी पाज. तिला आंबोण चार. तूं वांसरूं सोडून गाईची धार काढ. गाय लाथ मारील म्हणून तिला अगोदर भाला घाल. वांसरासाठीं दोन सड राखून ठेव. वांसराची पोटमार करूं नको. आतां गोवारी गाय न्यावयास येईल. गाय रानास गेली म्हणजे गाईचा गोठा झाडून साफ कर. गंगीनें दूध तापत ठेविलें असेल. तिला सांग कीं दुधाखालीं जाळ मंद लाव, नाहीं तर दूध उतास जाईल. दुधावर साय धरली म्हणजे दुधाणें चुलीवरून खालीं उतर. दूध निवत आलें म्हणजे त्यांत विरजण घाल.

धडा विसावा.

आई, मला तहान लागली आहे, पाणी प्यावयास दे. मला लोटीभर पाणी पाहिजे. माझी लोटी कोठें आहे? बाळा, ती पहा तुझी लोटी पाण्यानें भरून ठेविली आहे. ती घे, आणि पाणी पी. आई, ही लोटी कशाची केली आहे? बाळा, ती पितळेची केली आहे. आई, मला वाटतें कीं ही सोन्याची आहे. तूं कशावरून सोन्याची म्हणतोस? ही पहा कशी पिंवळी दिसते ती. पिंवळी दिसली म्हणजे सोन्याची झाली काय? तर पितळेपेक्षां सोन्यांत अधिक काय असतें? मुला, सोन्याच्या भांड्याला डाग पडत नाहीं, आणि पितळेच्या भांड्याला डाग पडतो. पण आई, माझ्या लोटीला डाग नाहीं. अरे, ती म्यां नुकतीच घांसून पुसून पाण्यानें भरून ठेविली होती, म्हणून तिजवर डाग नाहीं. हीच लोटी तूं उद्यां पहा म्हणजे तिजवर तुला डाग दिसतील.

धडा एकविसावा.

कुत्रा आणि त्याची पडछाया.



एक कुत्रा तोंडांत भाकरीचा तुकडा धरून नदी उतरून पलीकडे जात होता, त्यानें आपली पडछाया पाण्यांत पाहिली. तेव्हां त्यास असें वाटलें कीं, हा कोणी दुसरा कुत्रा भाकर तोंडांत घेऊन जात आहे, ती भाकर आपण त्याजवळून घ्यावी. असें मनांत आणून तो तोंड उघडून लोभानें ती धरावयास गेला, तों तोंडांतील भाकर पाण्यांत पडून तळीं गेली, ती पुन्हा त्यास सांपडली नाहीं.

तात्पर्य.

देवानें आपणास जें दिलें आहे त्यामध्यें संतोष न मानून जो दुसऱ्याचें घ्यावयास पाहतो, त्यास तें मिळत नाहीं, आणि जवळ असतें तें ही जातें.

धडा बाविसावा.

धनगराचा पोर.



एका धनगराचा पोर मेंढरें राखीत असतां, लांडगा आला, रे, लांडगा आला, म्हणून थट्टेनें

वेळोवेळीं ओरडत असे. तें ऐकून जवळच्या शेतांतून कुळंबी धांवून येत; आणि पहात तों तेथें लांडगा नाहीं. असे दोन चार वेळां ते फसले; तेव्हां ते मनांत समजले कीं, पोर लबाड आहे, ह्याची हाक पुन्हा मनास आणूं नये. मग एके दिवशीं लांडगा खराच आला, त्यावेळेस तो पोर घाबरून हाका मारूं लागला. तेव्हां, पहिल्याप्रमाणें हीही लबाडी असेल, असें समजून कोणी धांवून गेला नाहीं. मग त्याचीं तीं मेंढरें लांडग्यानें सावकाश मारून खाल्लीं.

तात्पर्य.

जो मनुष्य लबाड असा एक वेळ समजला, त्याच्या बोलण्यावर मग लोक विश्वास ठेवीत नाहींत. तो खराही संकटांत असला तरी त्याची गोष्ट खोटी मानून त्यास कुमक करीत नाहींत.

धडा तेविसावा.

वानर.



वानर रानांत राहतात. ते झाडांवर उड्या मारितात, आणि फळें खातात. गांवांत आले तर ते लोकांस फार त्रास देतात. खाण्याचा कांहीं पदार्थ दृष्टीस पडला म्हणजे तो उचलून नेतात. कोणीं त्यांची खोडी केली तर ते आंगावर येतात आणि ओरबाडतात.

वानराचें तोंड कांहींसें माणसाच्या तोंडासारखेंच असतें, परंतु त्याला बोलतां येत नाहीं. वानरास हात असतात. तो आपल्या हातांनीं पदार्थ उचलितो; पण त्याला लिहितां येत नाहीं, आणि माणसें जीं कामें हातांनीं करितात तीं

त्याला करितां येत नाहींत. वानर उड्या मारितो, चेष्टा करितो, आणि खोड्या करितो, पण त्यास कोणतेंही चांगलें काम करितां येत नाहीं.

मुलांनीं वानरासारख्या चेष्टा व खोड्या करूं नयेत; तंटे करूं नयेत; दुसऱ्या कोणास ओरबाडूं नये, वेडावूं नये; मेहनत करावी; चांगल्या गोष्टी शिकाव्या; गरिबीनें वागावें, आणि एकमेकांच्या उपयोगीं पडावें.

मुलांकडून पाठ करवावयाची कविता.

देवाची प्रार्थना.

अभंग.

देवा आम्ही बाळ । आमचा सांभाळ ॥
कीजे सर्व काळ । दीन बंधू ॥ १ ॥
आहों बळहीन । नाहीं आम्हां ज्ञान ॥
आमचें पालन । कीजे देवा ॥ २ ॥
आम्हांसी रक्षावें । आणि वाढवावें ॥

बुद्धिज्ञान द्यावें । कृपावंता ॥ ३ ॥
आम्हां बाळांवर । ममता अपार ॥
देवा निरंतर । असों द्यावी ॥ ४ ॥

आईचे उपकार.

पद.

थोर तुझे उपकार ॥
आई थोर तुझे उपकार ॥ धृ० ॥
वदत विनोदें, हांसत, सोडी ॥
कोण दुधाची धार ॥ १ ॥
नीज न आली तर गीत म्हणे ॥
प्रेम जिचें अनिवार ॥ २ ॥
येई दुखणें तेव्हां मजला ॥
कोण करी उपचार ॥ ३ ॥
कोण कडेवर घेउनि फिरवी ॥
चित्तीं लोभ अपार ॥ ४ ॥
बाळक दुर्बळ होतों तेव्हां ॥
रक्षण केलें फार ॥ ५ ॥
त्वांचि शिकविलें वाढविलें त्वां ॥
आहे मजवर भार ॥ ६ ॥

स्मरण तुझ्या ह्या दृढ ममतेचें ॥
होतें वारंवार ॥ ७ ॥
नित्य करावें साह्य तुला मी ॥
हा माझा अधिकार ॥ ८ ॥

देवा विषयीं.

तुकारामाचे अभंग.

आपुलिया बळें । नाहीं बोलवत ॥
सखा कृपावंत । वाचा त्याची ॥ १ ॥
साळूंखी ते कैशी । बोले मंजुळवाणी ॥
बोलविता धणी । वेगळाची ॥ २ ॥
काय म्यां पामरें । बोलावीं उत्तरें ॥
परि त्या विश्वंभरें । बोलवीलें ॥ ३ ॥
तुका म्हणे त्याची । कोण जाणे कळा ॥
वागवी पांगुळा । पायांवीण ॥ ४ ॥

श्लोक.

मुके आंधळे पांगळे आणि थोंटे ॥
अशा दुर्बळांला करा साह्य मोठें ॥

जरी त्यांस हांसाल होतील तोटे ॥
तुम्हांलाच होतां तसें जाल कोठें ॥

साक्या.

प्रातःकाळीं थंडगारसा । वारा झुळ झुळ येतो ॥
सर्वांला तो हुशार करितो । सुखशांतीही देतो ॥१॥
जीव वनस्पति ह्यांस निरंतर । तो आहे आधार ॥
सुखदाता जो देव दयाळू । त्याचा हा उपकार ॥२॥

समाप्त.